नियमित दरखास्त क्र.३६/२०१२

निशाणी क्र.६२

**नाव – निळकंठ मधुकर बारगजे**

**वय – ४७ वर्ष**

**व्यवसाय – नोकरी**

**पत्ता – अहिल्यानगर**

**साक्षीदाराचा सरतपास धनको तर्फे अॅड एम आर कुटे यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

१. मी परीरक्षण भूमापक या पदावर, नगर भूमापन अधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे सन २०१९ पासून कार्यरत आहेत. त्यापूर्वी मी सन २०१० ते २०१३ या कालावधीमध्ये निमतानदार क्रं.१ या पदावर उपअधिक्षक, भूमिअभिलेख, नेवासा येथे कार्यरत होतो. न्यायालयाने मौजे लोहगाव येथील गट क्रं.६६ याची मोजणी करण्याचा आदेश आमच्या कार्यालयाकडे पाठविला होता. सदरचा आदेश प्राप्त झाल्यानंतर कार्यालयामार्फत धनको यांचेकडून मोजणीचा अर्ज भरुन घेतला. तसेच माजणीकामी मोजणी फी भरुन घेतली. दिनांक २६.०६.२०१२ रोजी कार्यालयाने मला मोजणी करणेकामी आदेश दिला. नंतर दिनांक २१.०८.२०१२ ही मोजणी तारीख निश्चित केली. त्याप्रमाणे धनको व ऋणको यांना दिनांक २६.०७.२०१२ रोजी नोटिस रजिस्टर पोस्टाने पाठविल्या. त्याचा स्थळप्रती मी निशाणी १८ सोबत अभिलेखावर दाखल केलया आहे. आता मी निशाणी १८ सोबत नोटिसची स्थळप्रत पाहिली. त्यावर माझी

सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास निशाणी ६३ देण्यात आली. तसेच नोटिस पाठविल्याच्या एकूण २२ पावत्या दाखल केल्या आहेत. त्यास एकत्रात निशाणी ६४ देण्यात आली. त्यानंतर बजावणी झालेल्या पोस्टाच्या १७ पावत्या परत आल्या. त्यास एकत्रात निशाणी ६५ देण्यात येते. प्रेमचंद शिरसाठ, संजय अंबादास कराळे, छाया सुरेश केदारी व रंजना किशोर म्हस्के यांच्या नोटिसा बजावणी न होता परत आल्या. त्यास निशाणी ६६ ते ६९ देण्यात आली.

२. मी मोजणी करण्याकरिता आमच्या कार्यालयातून गट क्रं ६६ चा जमीन एकत्रीकरण योजनेचा उतारा, सव्हे नं .१४ चे टिपण व गट क्रं. ६६ चा गाव नकाशा अशी कागदपत्रे घेवुन गेलो होतो. त्यानंतर दिनांक २१.०८.२०१२ रोजी गावी गट क्रं.६६ येथे जावुन धनको व ऋणको यांनी दाखविलेल्या वाहीवाटी प्रमाणे चुनाचे सिमांकण केले, फलक यंत्रचे साहायाने मोजणीचे काम पूर्ण केले. मोजणी केल्याबाबत जबाब नोंदवला. त्यावर संपत सुमंत शिरसाठ व आर. आर. शिरसाठ यांनी व मी सहया केलया. अभिलेखाच्या आधारे मोजणी नकाशा तयार केला.

३. हद्दीच्या खुणा कायम करणे कामी दिनांक १७.०९.२०१२ ही तारीख निश्चित करुन धनको व ऋणको यांना नोटिसा पाठविल्या. नोटिसची स्थळप्रत अभिलेखावर दाखल आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास निशाणी ७० देण्यात आली. तसेच नोटिस

रजिस्टर पोस्टाने पाठविल्याच्या एकूण २२ पावत्या दाखल आहे. त्यास एकत्रत निशाणी ७१ देण्यात येते. दिनांक १७.०९.२०१२ रोजी प्रत्यक्ष गट क्रं. ६६ मध्ये जावुन न्यायालयाने आदेशित केल्याप्रमाणे व मी तयार केलेल्या नकाशाप्रमाणे हद्दीच्या खुणा कायम केलया. त्याचा जबाब नोंदवला. त्या जबाबावर धनको, ऋणको नं. १ व माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी ७२ देण्यात येते. हद्दी खुणा कायम केल्याबाबत पंचनामा तयार केला. त्यावर चार पंच व माझी सही आहे. त्यास निशाणी ७३ देण्यात येते.

४. आता मी तयार केलेल्या नकाशाची व अभिलेखावर दाखल असलेली नकाशाची ब प्रत पाहिली. ती प्रत अ प्रतीप्रमाणे बरोबर आहे. मोजणी हद्दी अश्या आढळून आल्या की, प्रतिवादी नं. १२ भाउसाहेब चिमाजी ससे याची वादीच्या ९ आर क्षेत्रावर ताबा असल्याचे दिसून आले. प्रतिवादी नं. १३ वत्सला दत्तात्रय कलापुरे यानी वादीच्या १० आर क्षेत्रावर ताबा केलयाचे दिसून आले. प्रतिवादी नं. १४ जानकाबाई भिमराज कलापुरे यानी वादीच्या ७ आर क्षेत्रावर ताबा केलयाचे दिसून आले. प्रतिवादी नं. १५ सुमन अशोक जखले व प्रतिवादी नं. १७ संजय अंबादास कराळे यांचा वादीच्या २७ आर क्षेत्रावर ताबा असल्याचे दिसून आले. प्रतिवादी नं. १६ छबुबाई दामोधर कलापुरे यांचा वादीच्या १९ आर क्षेत्रावर ताबा असल्याचे दिसून आले. तसेच प्रतिवादी नं. १३

यांनी प्रतिवादी नं. १२ यांच्या १४ आर क्षेत्रावर ताबा केल्याचे दिसून आले. प्रतिवादी नं. १४ यांनी प्रतिवादी नं. १३ यांच्या १८ आर क्षेत्रावर ताबा केल्याचे दिसून आले. प्रतिवादी नं. १५ व १७ यांनी प्रतिवादी नं. १४ यांच्या १४ आर क्षेत्रावर ताबा केल्याचे दिसून आले. लगत गट नं. ६७ चे धारकांनी गट नं. ६६ मध्ये ६ आर क्षेत्रावर ताबा केल्याचे दिसून आले व गट क्रं. ६९ चे धारकांनी गट नं. ६६ मध्ये ३४ आर क्षेत्रावर ताबा केल्याचे दिसून आले. प्रतिवादी नं. १ यांनी वादी यांच्या ४ आर क्षेत्रावर ताबा केल्याचे दिसून आले. प्रतिवादी नं. २ यांनी वादी यांच्या २१ आर क्षेत्रावर ताबा केल्याचे दिसून आले.

**मध्यांन्हतरामुळे सरतपास तहकूब**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

स्वाक्षरीत/-

(**संध्या यु. सुळ**)

दिनांक-०७/०५/२०२५.

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

नेवासा

**मध्यांन्हतरानंतर सरतपास शपथेवर सुरु**

नकाशामध्ये मी अतिक्रमण वेगवेगळया रंगाने दाखविलेले आहे. सुचीमध्ये समजुतीच्या टिपा दिलेल्या आहे. नकाशावर माझी व तपासणार यांची सही आहे. तसेच उपअधिक्षक, भूमिअभिलेख, नेवासा यांची सही आहे. मोजणीची तारीख व हद्दीच्या खुणा कायम केल्याची तारीख नमूद आहे. मोजणीकामी दोन कायम खुणा आढळून आल्या. त्या नकाशामध्ये O व A या अक्षराने दाखविलेल्या आहे. मी अहवालासोबत नकाशाची ब प्रत दाखल केलेली आहे. ती प्रत मी आज रोजी सोबत आणलेल्या अ प्रती प्रमाणे बरोबर आहे. नकाशास निशाणी ७४ देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

**ऋणको नं. १ ते ११ तर्फे अॅड बी.एस. शिरसाठ यांनी उलटतपास नाकारला.**
**ऋणको नं. १२ ते १७ यांना पुकारले असता ऋणको व वकील गैरहजर. मुदतीचा अर्ज दाखल नाही. सबब ऋणको नं. १२ ते १७ यांच्या तर्फे उलटतपास नाही.**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**
स्वाक्षरीत/-
(**संध्या यु. सुळ**)
दिनांक-०७/०५/२०२५. २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
नेवासा